## कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/४२४/२०२४ दि.03/११/२०२४

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने दि. ०४/११/२०२४ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार श्री अविनाश अनंत जाधव यांच्या प्रचारार्थ ब्रम्हांड बस स्टॉप समोरील सार्वजनिक रोडवर मनसे अध्यक्ष श्री. राज ठाकरे यांची सभा होणार आहे. त्यावेळी सदर** परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक तसेच मनसे पक्षाचे पदाधिकारी व ३००० ते ४००० स्त्री/पुरुष कार्यकर्ते येण्याची शक्यता आहे. सदर सभा हि सार्वजनिक रोडवर असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मानपाडा सर्व्हिसरोडने ब्रम्हांड सिग्नल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शक्तीपिठ मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** मानपाडा सर्व्हिसरोडने ब्रम्हांड सिग्नल कडे जाणारे सर्व प्रकारची वाहने ही शक्तीपिठ मंदिर येथुन यु टर्न घेउन मानपाडाब्रिज खालून, पातलीपाडा ब्रिज, आयुक्त बंगला सर्कल, रूनु टॉवर येथुन उजवी बाजुस वळण घेउन ईच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पातलीपाडा ब्रिज कडुन ब्रम्हांड सिग्नल मार्गे ब्रम्हांड सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पातलीपाडा ब्रिज सर्व्हिसरोड रिक्षा स्टॉप येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** पातलीपाडा ब्रिज कडुन ब्रम्हांड सिग्नल कडे जाणारे सर्व वाहने ही पातलीपाडा ब्रिज येथुन आयुक्त बंगला सर्कल, रूनु टॉवर येथुन उजवी बाजुस वळण घेउन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कोलशेत कडून ब्रम्हांड सिग्नल मार्गे मानपाडा घोडबंदर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्रम्हांड सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** कोलशेत कडून ब्रम्हांड सिग्नल मार्गे मानपाडा, घोडबंदर कडे जाणारे सर्व वाहने हि कावरा बि. चौक, रूनु टॉवर येथुन डावी बाजुस वळण घेउन, पातलीपाडा ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ब्रम्हांड फेज १ ते ७ कडुन ब्रम्हांड सिग्नल मार्गे मानपाडा, कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्रम्हांड सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ब्रम्हांड फेज १ ते ७ कडनु ब्रम्हाड सिग्नल मार्गे मानपाडा कडे जाणारी सर्व वाहने हि ब्रम्हांड सर्कल येथून युटर्न घेउन कावरा बि. चौक, रूनु टॉवर येथुन डावी बाजुस वळण घेउन पातलीपाडा ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०४/११/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. ते सभा संपे पावेतो अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करणास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, १ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे, प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.